जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद

अदालत रोड, औरंगाबाद ४३१ ००१.

निविदा सुचना

मा. जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद, दिवाणी न्यायालय व.स्तर, औरंगाबाद व मुख्य न्यायादंडाधिकारी, औरगाबाद यांचे आस्थापनेवरील न्यायालये व कार्यालये यांचे करीता दैनंदिन कामकाजासाठी पुढील एका वर्षाच्या कालावधीसाठी **Kyocera कंपनीचे टोनर रिफीलींग, तसेच Epson M2170 या प्रिंटरची Epson Ink Bottle Netto 120ml आणि एकदाच उपयोगात येणारे Zebronics कंपनीचे टोनर HP Laser Jet 1020 Plus, HP Laser Jet P1566, HP Laser Jet Pro M202dw, Canon Printers** साठी **खरेदी** करण्यासाठी स्थानिक बाजारपेठेतुन मोहरबंद निविदा/दरपत्रके दिनांक—०३/०७/२०२५ ते दिनांक—०८/०७/२०२५ या कालावधीत मागविण्यात येत आहेत.

संबंधीतांनी Kyocera कंपनीचे टोनर रिफीलींग करणेसाठी, तसेच Epson M2170 या प्रिंटरची Epson Ink Bottle Netto 120ml आणि एकदाच उपयोगात येणारे Zebronics कंपनीचे टोनर संबंधीतांनी कार्यालयात येवुन/कार्यालयातुन Cartridge/Toner Kit हस्तगत करणे व त्याचा या कार्यालयापर्यंत पोहोचविणे तसेच एकदाच उपयोगात येणारे Zebronics या कंपनीचे टोनर रिकामे झाल्यानंतर परत घेवून जाणे, निविदाकारांची जबाबदारी राहील. त्याबाबतचा खर्च (Delivery Charges) कार्यालयाकडुन अनुज्ञेय राहणार नाही. प्रस्तुतच्या सेवेकरीता निविदाकारांनी कार्यालयात अत्यंत गरजेच्या रिफीलींग करीता आपला भ्रमणध्वनी (Mobile No.) देणे आवश्यक आहे. या अटी व शर्तींवर निविदाकारांनी मोहरबंद निविदा/दरपत्रके विहित मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

मोहरबंद निविदा /दरपत्रके दिनांक—०३/०७/२०२५ ते दिनांक—०८/०७/२०२५ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत म्हणजेच ६:०० वाजेपर्यंत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे. तद्नंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रकांचा प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवत आहे.

आदेशावरुन,

03.07.2025

प्रबंधक

जिल्हा व सत्र न्यायालय

औरंगाबाद

दिनांक :— ०३/०७/२०२५

टिप :—

०१) निविदाकारांनी निविदा/दरपत्रक सादर करतांना त्यावर GST/SGST क्रमांक नमुद असलेले तथापी, GST/SGST क्रमांक लागु नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.

०२) निविदाकारांनी निविदा/दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक असेल.

०३) प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा/दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.

०४) खरेदी प्राधिकाऱ्या बरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि ईच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकारांना हमीपत्र सादर करावे लागेल.

०५) निविदा मान्य करणेबाबतचे अंतिम अधिकार हे निविदा समितीकडे आहेत.